# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वयेदाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ६५९/२०१८**

**तक्रारकर्ता श्री. शिरीष गोटेचा**

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतुक)**
सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतुक) यांचे कार्यालय,
कांदिवली (पूर्व) मुंबई -४०० १०१.

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी**
दहिसर उपप्रादेशिक विभाग, सीटीएस नं.५३/४,
बी.एस.सी.मार्ग, डेपो इमारत, कांदरपाडा, दहिसर (प) मुंबई -४०० ०६८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (पश्चिम उपनगरे)**
सशस्त्र पोलीस प्रशिक्षण क्रीडा व कल्याण, ए विंग, रुम नं.७,
पहिला मजला, हंसभुग्रा मार्ग, कलीना, सांताक्रुझ (पूर्व) मुंबई -४०० ०९९.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १६.०५.२०२४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०७.०५.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०२१/M/००३८९३ प्रकरणी आयोगाने दि.२८.११.२०१८ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

"जन माहिती अधिकाऱ्यांनी, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, दहिसर उप प्रादेशिक विभाग, सीटीएस नं. ५३/४, बी.एम.सी. मार्ग डेपो इमारत, कांदरपाडा, दहिसर, मुंबई- ६८ यांच्याकडून उक्त टॅक्सी/ रिक्षा स्टँडला दिलेल्या मान्यतेविषयीची कागदपत्र प्राप्त करुन अपीलकर्त्यांना दि. १७.१२.२०१८ पर्यंत पोस्टाने पाठवावीत. आयोग, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, दहिसर यांना असे निर्देश देत आहे की, त्यांनी उक्त माहिती तात्काळ वाहतूक पोलीस विभागाला उपलब्ध करावी. या आदेशासह अपील मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.

तसेच आयुक्त (परिवहन) यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८) अन्वये असे निर्देश दिले की, ज्या ज्या ठिकाणी टॅक्सी/ रिक्षा स्टँड मान्य करण्यात आले आहेत, त्याची माहिती संबंधीत सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याविषयी आदेश द्यावेत."

उक्त आदेशानुषंगाने अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज तक्रार क्र.६५९/२०१८ मध्ये दाखल करण्यात आला असून सदर तक्रार अर्जावर आज दि. १६.०५.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.

..२/-

तक्रारकर्ता यांनी दि. १७.१२.२०१८ रोजी तक्रार अर्ज सादर करुन असे नमुद केले आहे की, आयोगाचे आदेश दि. २८.११.२०१८ नुसार त्यांना माहिती प्राप्त झाली असून सदर माहिती ही दिशाभूल करणारी आहे व मालाड (प.) येथील फास्ट ट्रॅक रस्त्यावरील उजव्या बाजूस अनधिकृतपणे टॅक्सी/ रिक्षा स्टँड असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी असे सादर केले की, आयोगाच्या आदेश दि. २८.११.२०१८ च्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे व माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

तसेच तक्रारकर्ता यांनी साईनाथ रोड ते मालवणी दरम्यानच्या शेअर ए टॅक्सी स्टँडबाबत विचालेल्या माहिती (टॅक्सी संख्या व सदर रस्ता हा वन- वे असल्याने तिथे टॅक्सी स्टँड योग्य आहे किंवा नाही) याबाबत फेर सर्वेक्षण करुन आयोगास अहवाल सादर करण्यात येईल.

सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

आदेश

**१) वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांत आयोगास अहवाल सादर करावा.**

**२) सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २७.०६.२०२४ रोजी दुपारी ०२.३० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

17-5-2024

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**

**दिनांक : १७.०५.२०२४** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ६५९/२०१८**

**तक्रारकर्ता श्री. शिरीष गोटेचा**

**सुनावणी दिनांक : २७.०६.२०२४ (In continuation of order dt १७.०५.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ३०.०५.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी आयोगाने दि. १७.०५.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी साईनाथ रोड ते मालवणी दरम्यानच्या शेअर ए टॅक्सी स्टँडबाबत विचारलेल्या माहिती (टॅक्सी संख्या व सदर रस्ता हा वन-वे असल्याने तिथे टॅक्सी स्टँड योग्य आहे किंवा नाही) याबाबत फेर सर्वेक्षण करुन आयोगास अहवाल सादर करावा असे आदेशित केले होते.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश दि. १७.०५.२०२४ च्या अनुषंगाने दि. २४.०६.२०२४ चा अहवाल आयोगास सादर केला. त्याबरोबर वाहतूक पोलीस व म.न.पा. यांचे संयुक्त सर्वेक्षण अहवाल व गुगल मॅपिंग आयोगास सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी अहवाल सादर करुन असे नमुद केले की, साईनाथ रोड (रेल्वे टनल ते एस.व्ही. रोड) एकमार्गी रस्ता असून उजव्या बाजूला असलेली टॅक्सी स्थानके प्रवाशांच्या चढ- उतारासाठी धोकादायक आहेत. सदर एस.व्ही. रोडवरील टॅक्सी स्थानके डाव्या बाजूला स्थलांतरीत करुन तेथील सर्व स्थानकांवरील वाहनांची संख्या पुन:निश्चित करुन सर्व स्थानके डाव्या बाजूला असावीत अशी शिफारस केली आहे. त्यानुसार सदर स्टँडबाबत पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

विभागाने प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी योग्य ती कार्यवाही करावी.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission, Greater Mumbai

(Signature) 1-7-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**

**मुंबई**

**दिनांक : ०१.०७.२०२४**

**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**